# आर सी एफ शेती पत्रिका

**कृषी समृद्धीची मार्गदर्शिका**

समृद्धीची एकत्र वाटचाल

150 YEARS OF CELEBRATING THE MAHATMA





वर्ष १० अंक – १० मुंबई एप्रिल २०१९ पाने – २४ किंमत ₹ ५/–








# कार्यकारी संचालकांचे मनोगत...

शेतकरी खत व्यवस्थापन किंवा कृषी निविष्ठांचा वापर बऱ्याच वेळा खत विक्रेत्यांच्या सल्ल्याने किंवा त्याच्या निकटच्या इतर शेतकऱ्यांचे अनुकरण करून करत असतो. दररोज संबंध येणाऱ्या कृषी सेवा केंद्र धारकांवर शेतकरीवर्गाचा खूप विश्वास असतो. संबंधित कृषी सेवा केंद्रधारकाला कृषी विषयाचे सखोल ज्ञान असल्यासच शेतकऱ्यास योग्य सल्ला मिळू शकेल, कारण कृषी निविष्ठांचा दर जास्त असल्याने त्यांच्या काटेकोर आणि कार्यक्षम वापरास खूप महत्व असते. अन्यथा त्यांची फसवणूक होऊ शकते. गरज नसणारी, अनावश्यक ग्रेडची आणि नको तेव्हढी खते, किटकनाशके, बुरशीनाशके तसेच तणनाशके खरेदी केल्याने शेतीवरचा भार वाढत जातो. वाढत्या किंमतीमुळे उत्पादन खर्चही वाढत जातो आणि शेती परवडत नाही म्हणण्याची वेळ येते. नैसर्गिक आपत्ती व बाजारहमीभाव या नंतर उद्‌भवणारी ही मोठी समस्या आहे.

बहुतांश शेतकरी मातीची तपासणी करून घेत नाहीत. कृषीविकासाच्या दृष्टीने मातीची तपासणी ही एक अत्यावश्यक बाब आहे. पीक लागवडीपूर्वी जमिनीमध्ये कोणत्या गोष्टींची कमतरता आहे याचे अभ्यासपूर्वक नियोजन करून त्यादृष्टीने व्यवस्थापन करणे महत्वाचे असते. जमिनीच्या आरोग्यपत्रिकेचे व्यवस्थित वाचन करणारा कृषी केंद्र धारक, जमिनीचा सामू, क्षार विद्राव्य क्षमता, सेंद्रिय कर्ब, कोणते खत केव्हा आणि किती प्रमाणात द्यावे या बाबत मार्गदर्शन करू शकतो. एखादा शेतकरी जेव्हा अमुक एक खताचा आग्रह धरत असेल तर नत्र, स्फुरद पालाश इत्यादी अन्नघटकांच्या प्रमाणात माती परीक्षण अहवालानुसार ते खत किती प्रमाणात किफायतशीर आहे? जामिनीत सूक्ष्म अन्नघटकांची कमतरता आहे का? संतुलित व एकात्मिक खत व्यवस्थापन कसे करावे? लागवड केलेल्या पिकांमध्ये अन्नद्रव्यांची कमी दिसून येत असल्यास पान–देठ तसेच पाणी परीक्षणाची आवश्यकता आहे का? ही कमतरता विद्राव्य खत वापराने कशी भरून काढता येईल? इत्यादी प्रश्नांची उत्तरे संबंधित कृषी केंद्र धारकाला देता आली पाहिजेत, जेणेकरून शेतकऱ्यांचा होणारा अतिरिक्त खर्च वाचेल व त्यांच्या उत्पन्नात वाढ दिसून येईल. हीच बाब रासायनिक कीड व बुरशीनाशकांच्या बाबतीत आहे. शेतीविषयक माहिती असलेली व्यक्तीच कीड–रोगाची लक्षणे, त्याची तीव्रता ओळखून फवारणीची मात्रा ठरवून देऊ शकेल किंवा जैविक पद्धतीद्वारे नियंत्रणाचे उपाय सुचवू शकेल. सूक्ष्म अन्नद्रव्ये, बुरशी किंवा कीडनाशके, विद्राव्य खते एकमेकात मिसळून देताना घ्यावयाची खबरदारी याची माहिती मिळाल्यास अयोग्य वापराने होणारे शेतकऱ्यांचे नुकसान टळेल. तणनाशकांच्या बाबतही बऱ्याच गोष्टी शेतकऱ्यांना अनभिज्ञ असतात. तण उगवणीपूर्वीची, उगवल्यानंतरची, एकदल, द्विदल पिकातील तणनाशके, त्यांची मात्रा, फवारताना घ्यावयाची काळजी अशा असंख्य बाबी शेतकरीवर्गाला समजावून देणे गरजेचे असते.

आरसीएफने या दृष्टीने देशात अधिकृत खत विक्रेत्यांच्या सहयोगाने १५० 'किसान सुविधा केंद्रांची' सोय शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिलेली आहे. या केंद्रांवर कृषी पदवी–पदविकाधारकांमार्फत मार्गदर्शन केले जाते. ही सेवा शेतकऱ्यांसाठी मोफत आहे. सर्व शेतकरी बंधु भगिनींनी आरसीएफच्या या उपक्रमाचा उपयोग कृषीउन्नतीसाठी करून घेतला पाहिजे.

आपणासर्वांना गुढी पाडव्यानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

धन्यवाद.

**(एन.एच. कुरणे)**
कार्यकारी संचालक (विपणन)




श्री. प्रशेष प्रकाश घाणेकर,
मु. सुकदर, पो. फुरूस,
ता. खेड, जिल्हा रत्नागिरी

**आरसीएफ किसान केअर नं. : १८००-२२-३०४४ (नि:शुल्क)**

आरसीएफची खते, खत विक्रेते आणि शेतीविषयक सल्ला शेतकऱ्यांना सहज उपलब्ध व्हावा म्हणून आरसीएफने टोल फ्री नंबर सुरू केला आहे. हा क्रमांक १८००–२२–३०४४ असा असून त्यावर फोन केल्यास त्यासाठी शेतकऱ्यांना कोणतेही शुल्क द्यावे लागणार नाही. (सुट्टी व्यतिरिक्त सर्व दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत.)

**आरसीएफ किसान मंच – मोबाइल ॲप**

शेतकऱ्यांना कृषी विषयक माहितीसाठी 'आरसीएफ किसान मंच' हे मोबाइल ॲप गुगल प्ले स्टोअर वरून मोफत डाऊनलोड करून घेता येईल.

# अंतरंग


| | |
|---|---|
| • योग्य भाव, वाजवी दरात फळे, भाजीपाला याकरिता : शेतकरी आठवडा बाजार संकल्पना | ३ |
| • जनुकीय स्थानांतरीत पिके शाप की वरदान | ५ |
| • यशोगाथा – सोयाबीन : तुर आंतरपीक पध्दतीत सुधारित नाविन्यपूर्ण पट्टापेर पेरणी पध्दतीतून केली उत्पादनात भरघोस वाढ | ७ |
| • हळद बेण्याची साठवण | ८ |
| • कांदा चाळ उभारणी – साठवणुकीसाठी वरदान | १० |
| • आरसीएफ किसान सुविधा केंद्र– शेतकऱ्यांच्या कृषी प्रगतीचा साथीदार | ११ |
| • फुलकोबीमध्ये आढळणाऱ्या शारीरिक व्याधी | १३ |
| • मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना | १६ |
| • विचार जलसंवर्धनाचा | २१ |



समृध्दीची एकत्र वाटचाल

संपादक : शिरीष गंगाधर भोगले

Editor : Shirish Gangadhar Bhogale

संपादकीय समन्वयन – मिलिंद आंगणे

Editorial Co-ordination - Milind Angane

(022-25523022)



•सल्लागार समिती•
डॉ. बी. बॅनर्जी
श्री. गणेश वरगंटीवार
श्री. माल्कम क्रियाडो
सौ. निकीता पाठारे

•Advisory Committee•
Dr. B. Banerjee
Mr. Ganesh Wargantiwar
Mr. Malcolm Creado
Mrs. Nikita Pathare



शेती पत्रिका आता पुढील संकेत स्थळावर उपलब्ध.

www.rcfltd.com


# योग्य भाव, वाजवी दरात फळे, भाजीपाला याकरिता : शेतकरी आठवडा बाजार संकल्पना


डॉ.आदिनाथ ताकटे, मृद पदार्थविज्ञानवेत्ता,
महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी,
मो. ९४०४०३२३८९


आडत्यांच्या जोखडातून शेतकऱ्यांना मुक्त करून त्यांच्या शेतमालाला योग्य मोबदला मिळावा याकरिता राज्य सरकारच्या सहकार आणि महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने **'थेट शेतकरी ते ग्राहक'** या योजनेतर्गत 'संत शिरोमणी सावता माळी' आठवडा बाजाराच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या शेतमालास योग्य भाव आणि ग्राहकांना वाजवी दरात भाजीपाला मिळवून देण्यासाठी शहर आणि ग्रामीणस्तरावर 'आठवडा बाजार' ही संकल्पना राज्यात कार्यान्वित करण्यात आलेली आहे, ही निश्चितच स्वागतार्ह बाब आहे.

शेतकरी आठवडा बाजारात फक्त शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक सहकारी संस्था यांचा समावेश असून या माध्यमातून विविध प्रकारचा भाजीपाला व फळे एकाच ठिकाणी ग्राहकांना उपलब्ध होणार आहेत. त्याचा फायदा आता ग्राहकांनी घ्यावयास हवा. शेतकऱ्यांनी दर्जेदार, उत्तम गुणवत्तेचा शेतमाल या आठवडा बाजारात आणला तर ग्राहक त्याचे निश्चितच स्वागत करतील. शेतकऱ्यांना आडत्यांच्या जोखडातून मुक्त करून त्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळावा, त्यासाठी शेतकरी, शेतकरी गट, शेतमाल ऊत्पादक कंपन्यांनी समूह तयार करावेत. यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनीसुद्धा सहकार्य करणे आवश्यक आहे, जेणेकरून शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळेल.


Follow : rcfkisanmanch on
facebook twitter instagram

विधानभवनाच्या प्रांगणात मुंबईतील पहिल्या 'संत शिरोमणी सावता माळी' आठवडा बाजाराच्या उद्घाटनप्रसंगी आदिवासी विभागातर्फे लावलेल्या स्टॉलवर कुरडू, भारंगी, टाकळा यासह विविध फळे व भाज्यांची खरेदी करण्यास राज्याच्या लोकप्रतिनिधींनीसह जनसामान्यांनीही गर्दी केली होती. शिवार ते ग्राहक अशी थेट शेतमाल विक्रीची व्यवस्था उभी करणाऱ्या या योजनेमुळे उत्पादक शेतकरी ते ग्राहक या घटकांदरम्यानची दलालांची साखळी मोडीत निघून शेतकऱ्यांच्या शिवारातून शेतमाल थेट ग्राहकांच्या दारात मिळणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाचा भाव ठरविण्याचा अधिकार मिळाला असून ग्राहकांना देखील योग्य भाव, वाजवी दरात भाजीपाला उपलब्ध होणार आहे.

**शेतकरी आठवडा बाजाराची वैशिष्ट्ये :**

- शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीमाल विक्रीसाठी सक्षम पर्याय उपलब्ध झाला आहे.
- शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतमालाला योग्य भाव मिळावा व ग्राहकांनाही ताजी फळे व भाजीपाला वाजवी दरात उपलब्ध व्हावा यासाठी सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग आणि महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ यांच्या माध्यमातून या संकल्पनेस मूर्त स्वरूप देण्याच्या अंमलबजावणीस वाव मिळाला.
- ग्राहकांना इलेक्ट्रॉनिक वजन काट्यामार्फत योग्य वजनाचा ताजा भाजीपाला थेट शेतकऱ्यांमार्फत उपलब्ध होण्यास मदत झाली.
- शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतमालाचा बाजारभाव ठरविण्याचा अधिकार शेतकऱ्यांना मिळाला.
- शेतकरी आठवडा बाजार ठरलेल्या वारी, ठरलेल्या ठिकाणी, आठवड्यातून फक्त एकदाच आयोजित करण्यात येतात.
- राज्यात उत्पादित होणारी विविध प्रकारची फळे व भाजीपाला एकाच ठिकाणी ग्राहकांना उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येतो.
- शेतकऱ्यांना शेतमाल विक्रीबाबत तसेच या आठवडा बाजार आयोजनाबाबत कृषी पणन मंडळा मार्फत प्रशिक्षण देण्यात येते.
- शेतकरी आठवडा बाजारासाठी महानगरपालिका, नगरपालिका, शासनाचे विविध विभाग व इतर संस्था यांच्याकडून जागा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाचा प्रयत्न आहे.
- शेतमाल विक्रीसाठी सहभागी शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी ऊत्पादक कंपनी यांच्या मार्फत शेतकरी आठवडा बाजाराच्या आयोजनासाठी येणारा खर्च उदा. जागेचे भाडे, टेबल-खुर्च्या, पिण्याचे पाणी, वीज, कचरा निर्मुलन, पार्किंग नियोजन, सुरक्षा इत्यादींसाठी शासनाचे सहकार्य मिळते.
- महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ शेतकरी आठवडा बाजारासाठी आयोजक निवडण्याची जबाबदारी पार पाडणार आहेत.

पुणे येथील कोथरूड परिसरातील गांधीभवन येथे महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने राज्यातील पहिल्या शेतकरी आठवडा बाजाराची सुरुवात करण्यात आली होती. आज या महत्त्वाकांक्षी प्रकल्पास शेतकऱ्यांचा आणि ग्राहकांचा भरघोस प्रतिसाद मिळत आहे. आठवडा बाजार संकल्पनेमुळे राज्यातील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होईल तसेच ग्राहकांना ताजा भाजीपाला, फळे व फुले योग्य भावात मिळतील.

**चालढकल, आळशीपणा सोडला आणि भीतीवर मात केली तर कुणीही यशस्वी होऊ शकतो. जोपर्यंत तुमची मानसिकता बदलत नाही तो पर्यंत काहीच बदलणार नाही!**

# जनुकीय स्थानांतरीत पिके शाप की वरदान

सौ. यामिनी भाकरे, निवेदिका, आकशवाणी केंद्र (कृषी विभाग) नाशिक,
गंगापूर रोड, नाशिक. मो. ९४२२२८३३४३

वाढती लोकसंख्या व वाढत्या अन्नधान्याच्या गरजा भागवण्यासाठी शेतीमध्ये नवनवे तंत्रज्ञान उदयास आले. लागवडीच्या पद्धतीत बदल झाले. नवीन वाण संशोधित झाले. हरितक्रांती नंतर भारतीय शेतकऱ्यांचे उत्पन्नही वाढले. कीड आणि रोगांच्या नियंत्रणासाठी उत्कृष्ट प्रतीच्या औषधांचा शोध लागला पण खऱ्या अर्थाने कीड रोगांचा नायनाट झाला का? तर उत्तर 'नाही' असे येते. या सगळ्या परिस्थितीत जनुकीय सुधारित पिकांचा शोध शास्त्रज्ञांनी लावला. जैवतंत्रज्ञानाच्या सहाय्याने पिकामध्ये जनुकीय बदल किंवा सुधारणा घडवून आणल्या जातात यालाच 'जनुकीय सुधारित तंत्रज्ञान' असे म्हणतात. दोन किंवा अधिक जनुकांना जैवतंत्रज्ञानाद्वारे एकत्र करून नवीन अद्वितीय जनुकाची निर्मिती केली जाते. त्याला आपण 'जनुकीय अभियांत्रिकी तंत्रज्ञान' असेही म्हणतो आणि या तंत्रज्ञानाचा वापर करून जी पिके तयार केली जातात त्याला आपण **'जनुकीय सुधारित पिके'** (Genetically Modified Crops) असे म्हणतो. जगात आज जैवतंत्रज्ञानाद्वारे निर्मिती करून कपाशी, सोयाबीन, मका, पपई, बीट, वांगे ही पिके लागवडी खाली आणली आहेत. परंतु या पिकांपैकी प्रत्येक देशामध्ये जनुकीय सुधारित पिकांच्या स्विकृतीचे प्रमाण वेगवेगळे आहे. आपल्या भारतात कपाशी हे एकमेव पीक आहे ज्याची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. यासाठी वापरण्यात येणाऱ्या बीटी कॉटन वाणांचे उत्पन्नही चांगले येत आहे.

जागतिकस्तरावर अमेरिका, ब्राझील, अर्जेंटिना, भारत, कॅनडा आणि चीन हे देश जनुकीय सुधारित पिकांच्या उत्पादनात अग्रेसर आहेत. आपण जर सांख्यिकीय आढावा घेतला तर जागतिकस्तरावर १९९६ साली जनुकीय सुधारित पिकांच्या लागवडीखालील क्षेत्र १.७ दशलक्ष हेक्टर होते. ते आज तब्बल १७९ दशलक्षाहून अधिक आहे. आपल्या भारतात जर म्हणाल तर प्रामुख्याने वर्ष २००२ मध्ये कपाशीचे लागवडीखालील क्षेत्र १.३ दशलक्ष हेक्टर होते हे बीटी-कपाशी लागवडीचे पहिलेच वर्ष होते. आज हेच क्षेत्र १४.६ दशलक्ष हेक्टरपेक्षा अधिक झाले आहे. यावरूनच आपणाला जनुकीय सुधारित कपाशीकडे शेतकऱ्यांचा वाढता कल लक्षात येऊ शकतो.

जनुकीय पिके व त्यांची उत्पादने बाजारात येण्यापूर्वी कडक नियमन प्रक्रियेद्वारे तपासली जातात. त्यासाठी प्रत्येक देशाची नियमावली वेगवेगळी आहे. यामध्ये काही घातक घटक असतील तर त्याच्या तीव्रतेचे प्रमाण तपासले जाते, पोषणावरील परिणाम तपासले जातात, अनवधानाने उद्भवणारे, दुसऱ्या जीवांवरील होणारे परिणाम यांचाही अभ्यास केला जातो. तसेच पर्यावरणावरील घटक परिणामांची सुद्धा तपासणी केली जाते.

### जनुकीय पिकांचे फायदे –

✦ **जैविक रोगांना प्रतिकार करण्याची क्षमता वाढविणे –** यामध्ये आपण पाहीले तर सद्यस्थितीत भारतात बीटी कपाशीची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते ही कपाशी बोंडअळीला प्रतिकारक्षम आहे. ✦ **अजैविक घटकांसाठी प्रतिकार करण्याची क्षमता वाढवणे –** जागतिक स्तरावर गहू, भात, सोयाबीन आणि तंबाखू या पिकांमध्ये हे प्रतिकारक्षम जनुक प्रतिरोपीत केले आहे. ✦ **पोषणयुक्त पिके निर्माण करणे –** गोल्डन राईसमध्ये 'अ' जीवनसत्त्वाचे प्रमाण जास्त आहे. जनुकिय तंत्रज्ञानाचा महत्त्वाचा फायदा म्हणजे चांगली गुणवत्तायुक्त पिके यामुळे तयार करता येतात. एवढे फायदे असूनही जनुकीय सुधारित पिकांना विरोध आहे. कारण विविध संस्था परिषद, नैसर्गिक सुरक्षा संस्था यांच्याकडून अडथळे

निर्माण केले जातात. हे अडथळे राजकीय प्रेरणेने व तंत्रज्ञानाला विरोध याद्वारे केले जातात. यामध्ये आपल्याला असे दिसून येते की विरोध एखाद्या उत्पादनाच्या सुरक्षेविषयी नसून हा विरोध तंत्रज्ञानाला आहे अशी शंका येते. अशा प्रकारचे अडथळे हे तंत्रज्ञान पुढे नेण्यासाठी बाधा ठरत आहे. इथे आपल्याला समजते की या तंत्रज्ञानाद्वारे उद्‌भवणाऱ्या धोक्यांचे मुल्यमापन करू दिले जात नाही, कारण त्यांच्या मते मूल्यमापन करणे हेच धोक्याचे आहे. तसे जर आपण पहायला गेलो तर साधे शेंगदाणे सुद्धा सुरक्षेच्या नियमावलीमध्ये बसत नाहीत. कारण यामध्ये सुद्धा घातक पदार्थ असतातच आणि याचे मूल्यमापन पण केले जात नाही.

भारतातील शेतकऱ्यांचा कपाशी पीक लागवडीविषयीचा ओघ पाहिला तर २००२ मध्ये जागतिक पातळीवर भारताचे कापूस उत्पादन १४ टक्के होते ते २००८ मध्ये २६ टक्के झाले तर २०१६ मध्ये ते ३२ टक्क्यांपर्यंत वाढले. बीटी कपाशी वाणाचे पदार्पण झाल्यानंतर कपाशीची हेक्टरी उत्पादकता वाढली. क्षेत्रफळसुद्धा ६० टक्क्यांनी वाढले. आपल्या भारतात बीटी कपाशी लागवड होण्यापूर्वी ४५ टक्के किटकनाशके ही एकट्या कपाशीवर फवारली जात असत. हेच प्रमाण कमी होऊन आता ९ टक्क्यांपर्यंत आले आहे. २०१६-१७ मध्ये बोंडअळीचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे हे बियाणे कमी प्रतीचे असल्याचे निर्देश मिळाले, पण हा अपवाद आहे. बीटी-वाण हे शेतीला, शेतकऱ्याला वरदान ठरू शकतात. नुकतीच आशिया खंडातील बांगलादेशानेही बीटी वांग्याचे वाण लागवडीखाली आणले आहे. अर्थात भारतात या संबंधिचे प्रयोग झाले होते त्या मूल्यमापनाच्या आधारेच ही परवानगी अनेक देशांमध्ये स्वीकृतीच्या स्वरूपात दर्शवीली गेली आहे. १९५०-६० च्या दशकात आपल्या देशात साधे संकरीत बियाणे निर्माण करण्यासही बंदी होती. तेव्हा या संकरीत तंत्रज्ञानालासुद्धा विरोध झाला होता.

हरितक्रांतीनंतर लागवडी खालील क्षेत्र, उत्पादन आणि पिकांची उत्पादकता वाढावी यासाठी प्रयत्न करण्यात आले आणि नव्या तंत्रज्ञानाला चालना मिळाली. अनेक शास्त्रज्ञांच्या अथक प्रयत्नांनी संकरित वाणांची निर्मिती झाली. आज वाढत्या लोकसंख्येला बळीराजा अन्नधान्य पुरवतो ते या सुकर तंत्रज्ञानामुळे! शेतीतून अधिकाधिक उत्पादन घेण्यापर्यंत आज शेतकऱ्यांनी मजल मारली ती केवळ आधुनिक तंत्रज्ञानाच्या साथीनेच.

आजच्या बदलत्या काळात शेतीत बदल घडवणे गरजेचे आहे. आज अनेक पिके अशी आहेत ज्यात जैविक बदल घडवून, जनुक स्थलांतरीत करून नव्या वाणांची श्रृंखला भारतीय संशोधन संस्था जागतिक स्तरावर देऊ शकतात. यामध्ये कमी पाण्यात येणारी, कमी कालावधीची पिके, संकरित पिके आपण घेऊ शकतो. जनुकीय पिकांमध्ये असे अनेक वेगवेगळे गुणधर्म स्थलांतरीत करून उत्पादन वाढविण्यासाठी नक्कीच मदत करता येईल. शंका समस्यांबाबत संशोधन करून जनजागृती घडवता येईल त्यामुळे जनुकीय सुधारित पिके शेतकऱ्यांसाठी वरदानच ठरतील असे वाटते.

**कुणाला तरी तुमच्यापेक्षा चांगली नोकरी असते, कुणाकडे तुमच्यापेक्षा चांगले चार चाकी वाहन असते, बँकेतील त्याच्या खात्यात जास्त पैसे असतात, एखादी व्यक्ती तुमच्यापेक्षा विद्वान असू शकते, नेहमीच कुणीतरी तुमच्यापुढे असते, पण एक गोष्ट लक्षात ठेवा की, तुम्ही जिथे आहात आणि जसे आहात, तिथे तुम्ही सर्वोत्कृष्ट असता. तुम्ही जसे आहात तसे स्वतःला स्विकारा. आपली स्पर्धा इतरांशी असण्याऐवजी स्वतःशीच असली पाहिजे!**

*जगात खूप चांगले लोक आहेत. तुम्हाला एकही भेटला नसेल, तर तुम्ही स्वतः चांगले होण्याचा प्रयत्न करा!*

# यशोगाथा – सोयाबीन : तुर आंतरपीक पध्दतीत सुधारित नाविन्यपूर्ण पट्टापेर पेरणी पध्दतीतून केली उत्पादनात भरघोस वाढ

श्री. प्रा. जितेंद्र दुर्गे, सहयोगी प्राध्यापक (कृषी विद्या), श्रीशिवाजी कृषी महाविद्यालय, जिल्हा – अमरावती, मो. ९४०३३०६०६७

श्री. अंकुश संजय खोडस्कार राहणार वाकी (रायपूर), तालुका भातकुली, जिल्हा अमरावती यांनी सोयाबीन : तुर आंतरपीक पध्दतीने लागवड करतांना परंपरागत प्रचलीत पध्दतीला फाटा देऊन, नाविन्यपूर्ण



'पट्टापेर पेरणी पध्दतीच्या' माध्यमातुन सोयाबीन व तुर पिकाचे चांगले उत्पादन घेतले आहे. श्री. खोडस्कार यांचेकडे ५ एकर क्षेत्र लागवडीखाली आहे पण त्यांच्याकडे संरक्षित ओलीताची व्यवस्था असुन सुध्दा उत्पादनात फारसे यश मिळत नव्हते. श्री. खोडस्कार यांनी कृषीतज्ञांच्या सल्ल्याने आधुनिक कृषीतंत्राचा वापर करून ५ एकर क्षेत्रात सोयाबीन : तुर आंतरपीक घेतांना सुधारित नाविन्यपूर्ण पट्टापेर पध्दतीचा अवलंब करुन सोयाबीन तसेच तुर या दोन्ही पिकांच्या उत्पादनात भरघोस वाढ मिळवली आहे. २०१७-१८ च्या खरीपात वाकी गावातील इतर शेतकऱ्यांनी पारंपरिक प्रचलीत पध्दतीने सोयाबीन : तुर आंतरपीक पध्दतीत पेरणी केली होती, त्यांना सोयाबीन प्रती एकर सर्वसाधारणपणे ४-५ क्विंटल व तुर पिकापासुन प्रती एकरी ३ ते ४ क्विंटल पर्यंत उत्पादन मिळाले. याउलट श्री.अंकुश खोडस्कार यांना पाच एकर क्षेत्रात सोयाबीन ३२ क्विंटल आणि तुर ४५ क्विंटल एवढे उत्पादन मिळाले. म्हणजेच वाकी या गावातील सोयाबीन पिकाचे प्रती एकर सरासरी उत्पादन ४.५ क्विंटल गृहीत धरल्यास त्यांना प्रती एकरी उत्पादनात २ क्विंटल एवढी उत्पादनात वाढ मिळाली. तसेच तुर पिकापासून प्रती एकर ३.५ क्विंटल गृहीत धरल्यास ५.५० क्विंटल पर्यंत उत्पादनात वाढ प्राप्त झाली.

श्री. अंकुश खोडस्कार यांनी पट्टापेर पध्दतीचा अवलंब करतांना ७ फुट अंतरावर गादीवाफ्यावर तुरीची डोबीव पध्दतीने दोन झाडातील अंतर साधारणत: १५ इंच या प्रमाणे ठेवून लागवड केली होती. तुरीच्या दोन ओळीमधील जागेत तीन ओळी सोयाबीनच्या लावल्या. अशा प्रकारे तीन ओळी सोयाबीन : एक ओळ तुर या पध्दतीने सोयाबीन पूर्णपणे पावसाच्या पाण्यावर घेऊन तुर पिकासाठी ठिबकचे नियोजन केले होते. केवळ २-३ वेळा गरज असतांना (उगवणीसाठी, जुलै-ऑगस्ट महिन्यात पावसात मोठा खंड असतांना, सोयाबीनची कापणी झाल्यानंतर) पाणी दिले. तुर पिकाच्या ७ फुटावरील दोन ओळींमध्ये केवळ तीन ओळी सोयाबीन असल्यामुळे दोन्ही बाजुने तुर पिकासोबतच सोयाबीनला सुध्दा मोकळी जागा मिळाली. दोन्ही पिकाची निगराणी, निरीक्षण, फवारणी इत्यादी सहज शक्य झाले. तुर गादीवाफ्यावर असल्यामुळे तुरीच्या झाडावर बुडापासुनच फांद्या पोसल्या. मिळालेल्या फाद्यांच्या माध्यमातून उत्पादनात वाढ शक्य झाली. कुठलेही महागडे तंत्रज्ञान न वापरता, उपलब्ध संसाधनांचा यथायोग्य वापर करुन, केवळ नाविण्यपुर्ण सुधारित पेरणी पध्दतीचा अवलंब करुन श्री. अंकुश खोडस्कार यांनी हे यश संपादन केले व पंचक्रोशितील शेतकऱ्यांना नविन दिशा दिली. दरवर्षी तुर पिकामध्ये 'मर रोगाचा' प्रादुर्भाव जास्त रहायचा परंतू गादीवाफ्यावर तुर पीक असल्यामुळे मररोग अत्यंत अल्प प्रमाणात दिसून आला. सोयाबीनच्या ओळींची संख्या कमी होऊन सुध्दा इतर शेतकऱ्यांपेक्षा प्रती एकर उत्पादनात वाढ प्राप्त झाली असल्याचे व हे केवळ पेरणी पध्दतीच्या बदलातुन झाल्याचे श्री. अंकुश खोडस्कार यांचे मत आहे.

**संपर्क : श्री. अंकुश खोडस्कार**

**मो.नं. ९५४५४९६०३७**

# हळद बेण्याची साठवण

डॉ. अरुण नाफडे, उद्यान विशेषज्ञ, डी/६, ब्रह्मा मेमोरीज, भोसले नगर, पुणे- ७.
मोबा. ९८२२२६११३२

हळद पिकाची काढणी फेब्रुवारी महिन्यापासून सुरू होते आणि जातीपरत्वे एप्रिल महिन्यापर्यंत सुरू राहते. लागवडीनंतर ७-८ महिन्यात हळद काढणीसाठी तयार होते. हळदीच्या पानांचा रंग पिवळा होण्यास प्रारंभ होतो आणि हळूहळू खोड वाळत जाऊन खाली उतरते. त्या वेळेस जमिनीच्या पृष्ठभागावरील खोडाची कापणी करून हळद काढणी केली जाते. जमीन सुलभपणे खोदण्यासाठी क्षेत्रास हलके पाणी दिले जाते. त्यानंतर टिकाव किंवा यंत्राच्या सहाय्याने प्रत्येक झाडाच्या खाली असलेला हळदीचा गड्डा खोदून वर काढला जातो. गड्डे खोदून वर काढल्यानंतर २ ते ३ दिवसांनी हळदीच्या कंदांची मोडणी करून कंदांना चिकटलेली माती गड्डा हलवून वेगळी करावी. यावेळी मातृगड्डा (जेठागड्डा), बगलगड्डा, सोरागड्डा, हळकुंडे आणि रोगग्रस्त अथवा काढणी करताना जखम झालेले गड्डे किंवा हळकुंडे अशा प्रकारे ओल्या हळदीची प्रतवारी करून त्यांची वेगवेगळ्या ठिकाणी साठवण केली जाते. जेठागड्डा, बगलगड्डा आणि हळकुंडे लागवडीसाठी बेणे म्हणून वापरली जातात म्हणून बेणे निवडतानाच काळजीपूर्वक प्रतवारी करावी.

१) **जेठागड्डा (मातृगड्डा) :** मुख्य रोपाच्या खाली वाढणारा कंद असतो या कंदास 'जेठागड्डा' असे म्हणतात. प्रत्येक झाडापासून एकच जेठागड्डा मिळतो. पुढील हंगामात याचा लागवडीसाठी बेणे म्हणून उपयोग होतो यासाठी प्रत्येक गड्ड्याचे वजन ५० ग्रॅम पेक्षा जास्त असावे.

२) **बगलगड्डा :** जेठागड्ड्याच्या खाली वाढलेल्या गड्ड्यांना 'बगलगड्डा' असे म्हणतात. निवडलेल्या प्रत्येक बगलगड्ड्याचे वजन ४० ग्रॅम पेक्षा जास्त असावे. या प्रकारचे गड्डेसुद्धा बेणे म्हणून लागवडीसाठी वापरले जातात.



३) **हळकुंडे :** बगलगड्ड्यांना आलेल्या वाढीव कंदास 'हळकुंड' असे संबोधले जाते. ही हळकुंडेदेखील बेण्यासाठी वापरली जातात. निवडलेल्या हळकुंड कंदाचे वजन अंदाजे ३० ग्रॅम पेक्षा जास्त असावे. निवडलेली हळकुंडे लांब, ठळक, ठसठशीत वाढलेली असावी.

**साठवण :** प्रत्येक गड्ड्याची प्रतवारी झाल्यानंतर पुढील हंगामात लागवडीसाठी बेणे साठवून ठेवणे अत्यावश्यक असते. साधारणत: दोन ते अडीच महिन्याच्या कालावधीपर्यंत ताजे बियाणे सुप्तावस्थेत जाते. या सुप्तावस्थेच्या कालावधीत बियाण्यात अंतर्गत बदल घडून येत असतात. दोन ते अडीच महिन्यात सुप्तावस्था पूर्ण होते. सुप्तावस्था काळ संपल्यानंतर बेण्यामध्ये बाह्य स्वरूपात बदल दिसून येतात. म्हणजेच यावेळी बेण्यावरील डोळे फुगीर होऊन, फुटण्यास सुरुवात होते. मुळ्याविरहित, रसरशीत बेणे लागवडीसाठी वापरावे. साठवणूक करताना सूर्यप्रकाश, उष्ण वारा याचा बेण्याशी संपर्क येणार नाही याची काळजी घ्यावी. दोन ते अडीच महिने ताजे बेणे सुस्थितीत ठेऊन त्यांची साठवण करणे अतिशय गरजेचे आहे. यासाठी प्रतवारी केल्यानंतर

बियाणे त्वरित झाडाखाली सावलीत किंवा हवेशीर शेडमध्ये थंड ठिकाणी ढिग करून साठवावे. बेणे थोड्याशा उंचवट्यावर कोन पद्धतीने ढिग करून रचावे. यावर हळदीच्या वाळलेल्या पानांचा १५ ते २० सें.मी. थर देऊन झाकून घ्यावे. ज्या ठिकाणी तापमान जास्त असते अशा ठिकाणी पानांवर पुन्हा ओल्या गोणपटाने झाकून घ्यावे.

काही ठिकाणी सावलीत बियाण्याचा ढीग केल्यावर व पानांनी झाकल्यानंतर वरील पृष्ठभाग माती मिश्रीत शेणाने लिंपून काढतात. प्रतवारी केलेले बियाणे थंड जागी जमिनीमध्ये खड्डा करून त्यातसुद्धा साठविले जाते. खड्ड्यात बियाणे भरताना सोबत लाकडी भुसा घालतात आणि खड्ड्यात वायूसाठी एक किंवा दोन लहान छिद्रे असलेल्या लाकडीपट्टीने वरील खड्ड्याचे थर ठेवून खड्डा बुजवतात. अशा विविध पद्धतीने बियाणे साठवणूक केली जाते व हे बियाणे लागवड करताना बिजप्रक्रिया करून वापरले जाते. बियाण्यांची साठवणूक व्यवस्थितपणे केल्यास उत्पादन चांगले मिळते कारण बियाणे चांगले असले तर रोपे सुद्धा चांगली निपजतात.

## व्हॉट्स ॲप कट्टा

**माणसे प्रेम करण्यासाठी असतात...
आणि पैसा वापरण्यासाठी असतो.
हल्लीच्या युगात मात्र पैशांवर प्रेम केले जाते आणि माणसे वापरली जातात!**

---

**बायकोने केला पाकचा जबरदस्त निषेध !!!**

बायकोची आज कठोर **पाक**विरोधी भूमिका पहावयास मिळाली...

''मी आजपासून **पाक**युक्त गुलाबजाम करणार नाही! म्हैसूर**पाक** खाणार नाही! साखरेचा **पाक** करून कोणताच पदार्थ बनविणार नाही!

तसेच आजपासून स्वयं**पाक** सुद्धा बंद!!!

## शेती पत्रिका–अभिप्राय !

✦ शेती पत्रिकेमध्ये खूप चांगली माहिती वाचायला मिळते. नवीन बियाणे व अवजारे या विषयीची माहिती असलेला अंक खूप आवडला.

– अनंत महादेव गोरेगांवकर
मु. पो. गोरेगांव, ता. माणगांव,
जिल्हा – रायगड, मो. ९७६४३७०९४९

✦ आरसीएफ शेती पत्रिके मधून तज्ञ लोकांचे मार्गदर्शन लाभते. कृषी उत्पन्न वाढीची माहिती घर बसल्या मिळते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या ज्ञानात भर पडते.

– सुभाष कोंडीराम महाजन
मु. पो. बुध (पाचेगांव), ता. खटाव,
जिल्हा – सातारा ४१५५०३, मो. ९६६५७४१५३३

✦ मी गेल्या दहा वर्षापासून 'आरसीएफ शेती पत्रिका' मासिकाचा सभासद आहे. मी आरसीएफचीच खते वापरतो. मासिकातील तज्ञांच्या मार्गदर्शनानुसार शेती करण्याचा प्रयत्न करतो. मी आरसीएफचा फार आभारी आहे.

– गोपाळकृष्ण राजाराम गंधेपार
मु. पो. सवना, ता. महागांव,
जिल्हा – यवतमाळ ४४५२०५, मो. ७३५०२४६४५९

✦ मी बऱ्याच वर्षापासून आरसीएफ शेती पत्रिकेचा वाचक आहे आणि याचा मला चांगला फायदा होतो.

– जयसिंगराव विष्णूराव साळुंके
मु. पो. कोर्ले, ता. लांजा,
जिल्हा – रत्नागिरी ४१६७०१, मो. ९५९४०१४२७०

✦ आरसीएफ शेती पत्रिकेच्या आधारे आम्ही शेती मशागतीचे नियोजन योग्य पद्धतीने करू शकतो. हे मासिक शेतकऱ्यांसाठी संजिवक आहे. आपले हृदयपूर्वक अभिनंदन.

– नितीन श्रीपाल पंढरे
मु. पो. पाटकूल, ता. मोहोळ,
जिल्हा – सोलापूर ४१३२१३, मो. ९९६०५४४९८९

✦ अतिशय सुंदर आणि सोप्या शब्दात शेती पत्रिकेतून मार्गदर्शन मिळते. शेती विषयक लेखांची मांडणी उत्तम असल्यामुळे नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती मिळते.

– हेमंत सुर्यवंशी
मु. पो. कापडणे, ता. धुळे,
जिल्हा – धुळे ४२४३०७, मो. ८२०८७७१७७४

# कांदा चाळ उभारणी – साठवणुकीसाठी वरदान

श्री. शक्तीकुमार आनंदराव तायडे, उद्यानविद्या विभाग, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी.
मो.नं: ७३८७७२५९२६

कांद्याची योग्य वेळी काढणी करून तो चांगल्याप्रकारे सुकविल्यास कांद्याची प्रत आणि आकर्षकपणा टिकून राहू शकतो. कांदा सुकविल्यानंतर साठवणुकीपूर्वी कांद्याची प्रतवारी करणे खूप महत्त्वाचे असते. शास्त्रोक्त पद्धतीने कांदा साठवण केल्यास साठवणुकीतील नुकसान कमी होते. हा शेतमाल चांगला सुकवून कांदाचाळीत भरला की तो पाच महिने चांगला टिकतो. खराब वातावरणामुळे खरीप हंगाम वाया गेल्यास रब्बी हंगामात तयार झालेला व साठवणुकीत असलेला हा कांदा फेब्रुवारीपर्यंत पुरवून वापरावा लागतो. अशा वेळेस कांद्याच्या दरात मोठ्या प्रमाणात वाढ होते. या दरवाढीचा फायदा शेतकऱ्यांना होऊ शकतो.

खरीप व उशिरा खरीप हंगामात उत्पादन होणाऱ्या कांद्याची साठवणूक क्षमता कमी असते, तसेच कांदा सुकविण्यासाठी योग्य परिस्थिती नसल्याने खरीपाचा कांदा साठविला जात नाही, साठवणुकीतील कांदासाठा संपुष्टात आलेला असल्यामुळे बरेचदा चांगले बाजारभाव खरीप हंगामातील कांद्याला मिळत असतात, त्यामुळे शेतकरी हा कांदा काढणीनंतर त्वरित बाजारात विक्रीला आणतात. रब्बी हंगामातील कांदा हा साठवणूकीस योग्य असतो. तो पाच महिने टिकू शकतो, त्यामुळे हा कांदा साठवणूक करणे योग्य असते.

राज्यात एकूण उत्पादनापैकी रब्बी हंगामाचा हिस्सा २५ ते ३० लाख टन (६० टक्के) इतका आहे. शेतकऱ्यांनी हा कांदा साठवणूक न करता बाजारपेठेत एप्रिल ते मेमध्ये काढणीनंतर विक्रीला आणल्यास बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात आवक वाढल्यामुळे शेतकऱ्यांना बाजारभाव मिळत नाही.



बाजारभावात स्थिरता आणण्यासाठी व देशांतर्गत बाजारपेठेसाठी व निर्यातीसाठी मालाची उपलब्धता वाढविण्यासाठी कांदा साठवण आवश्यक आहे.

- कांद्याची योग्य वेळी काढणी करून तो चांगला सुकविल्यास कांद्याची प्रत आणि आकर्षकपणा टिकून राहू शकतो. साठवणुकीसाठी उत्पादित होत असलेल्या कांद्यास जास्तीत जास्त शेणखताचा अथवा हिरवळीच्या खतांचा वापर करावा.
- नत्राचा अती वापर केल्यास कांद्याचे आकारमान वाढते; परंतु तो जास्त काळ टिकत नाही, त्यामुळे साठवणुकीतील कांद्यास लागवडीनंतर ६० दिवसांच्या आत नत्र द्यावे. उशिरा नत्र दिल्यास माना जाड होतात, कांदा टिकत नाही. यासाठी कांद्याची लागवड करताना कांदा साठवायचा की काढणीनंतर त्वरित विक्री करावयाचा याचे नियोजन करावे.
- रब्बी किंवा उन्हाळी हंगामातील कांदा काढणीपूर्वी दोन ते तीन आठवडे आधीपासून पाणी तोडावे, त्यामुळे कांदा पक्व व घट्ट होतो आणि माना पडण्यास सुरवात होते.

**(पुढील मजकूर पान १८ वर)**

# आरसीएफ किसान सुविधा केंद्र : शेतकऱ्यांच्या कृषी प्रगतीचा साथीदार

श्री. मिलिंद आंगणे, उप व्यवस्थापक (सीआरएम-विपणन) आरसीएफ लि. मुंबई-२२







पूर्वी कृषी निविष्ठांच्या विक्रीचा व्यवसाय करणारी मंडळी ही सर्व सामान्य प्रवृत्तीनेच व्यापार करत असत. त्यातील बरेचजण शेतकरी किंवा शेतीतज्ञ नव्हते. फक्त गुंतवलेले भांडवल वसूल करून नफा कमविण्याचा दृष्टिकोन समोर ठेवूनच हा व्यवसाय केला जात असे. आता कृषी केंद्र धारक हा कृषी पदवीधर, किमान शेतीचे ज्ञान असलेला पदविका किंवा प्रमाणपत्रधारक असणे आवश्यक आहे. कृषी निविष्ठांचा व्यवसाय करणारी व्यक्ती परवानाधारक शेतकरी किंवा शेतीचे ज्ञान असणारी असायला पाहिजे ही बाब निश्चितच स्वागतार्ह आहे. शेती निविष्ठांचा व्यवसाय केवळ व्यापारी दृष्टिकोनातून करण्यापेक्षा शेतकऱ्यांचा मित्र या नात्याने केल्यास या व्यवसायाला चांगले दिवस येतील. कारण मित्र म्हटल्यावर माणसं जोडणं आणि या नात्याला व्यवहाराच्या पलिकडे जपणं हा प्रमुख उद्देश असतो. सगळ्याच बाबी व्यावहारिक पातळीवर मोजल्या न जाता काही बाबी मित्रत्वाला जागणाऱ्या पण असू शकतात. एवढे सर्व विशद करण्याचा हेतु एवढाच आहे की कृषी निविष्ठाधारक हा शेतकऱ्यांच्या प्रगतीमधला साथीदार, मार्गदर्शक असला पाहिजे. शेतीमध्ये शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी सोडविण्याचे हे ठिकाण असले पाहिजे.

माती परीक्षण ही कृषीशास्त्रातील एक महत्वाची पायरी आहे. पण शेतकरीवर्गाचे नेमक्या याच बाबीकडे दुर्लक्ष होत असते. पाणी तपासणीबाबत बोलायचे म्हटले तर विहिर, कालवा, कूपनलिका, तसेच नदीच्या पाण्याचा सामू वेगवेगळा असू शकतो! तपासणीअंतीच हे समजू शकते. बीजप्रक्रिया, पान-देठ तपासणी, किटकनाशके, बुरशीनाशके यांची फवारणी आणि सुरक्षा व्यवस्था, विद्राव्य खत व्यवस्थापन या संदर्भात शेतकऱ्यांना मार्गदर्शकाची आवश्यकता भासत असते. या बाबतीत कृषी सेवा केंद्रधारक त्यांच्या सर्वात जवळची व्यक्ती असते. यासाठी ही व्यक्ती सुशिक्षित व शेतीमधील अडचणी व समस्यांची जाण असणारी हवी, जेणेकरून शेतकऱ्यांना योग्य सल्ला मिळू शकेल. शेती उत्पादन वाढले तर त्यामधून निर्मित होणारा पैसा इतर माध्यमाप्रमाणेच कृषी निविष्ठा विक्रेत्यांकडेही येतच असतो. यामध्ये दोघांचीही प्रगती होत असते.

आरसीएफने शेतकऱ्यांची ही गरज ओळखून अधिकृत विक्रेत्यांच्या सहयोगाने देशभर **'किसान सुविधा केंद्रांची'** (**Model Fertilizer Retail Shop**) उभारणी केलेली आहे. या केंद्रांमधून कृषी पदवीधारकांकडून माती परीक्षणाकरीता माती नमून्यांचे संकलन आणि तपासणी अहवाल वाटप केले जाते. बीजप्रक्रिया तसेच पीक लागवड







विषयक सल्ला मिळतो. संतुलित खत वापर आणि विद्राव्य खत पद्धतीबाबत मार्गदर्शन करण्यात येते. पीक प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात येते आणि या बरोबरच शेतकरी सभा, कृषी दिन, कृषी मेळावे, पीक परिसंवाद, शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम यासारख्या कृषी विस्तार उपक्रमांमधून शेतकऱ्यांशी संवाद कायम ठेवला जातो. ही सेवा शेतकऱ्यांसाठी विनामूल्य आहे. एक मित्र, कृषीतज्ञ, मार्गदर्शक या नात्याने जर आपण कृषीवर्गाशी जोडले गेलो तर कृषी सेवा केंद्रधारक आणि शेतकरी हे नाते अधिक वृध्दिंगत होईल आणि देशाच्या कृषी विकासालाही हातभार लागेल.

यासाठी शेतकरी बंधु-भगिनींनी आपल्या नजिकच्या **किसान सुविधा केंद्राला** भेट देऊन आरसीएफच्या कृषी विकास योजनांचा आणि सुविधांचा लाभ घेणे फायदेशीर ठरेल.

**आता रब्बी तसेच काही उन्हाळी पिकांची काढणी संपलेली आहे. पुढील खरीप पीक लागवडीचे नियोजन करण्यापूर्वी शेतकऱ्यांनी प्रथम शेत जमिनीच्या मातीची तपासणी करणे आवश्यक आहे.**



**आरसीएफ तर्फे माती परीक्षणाची सुविधा शेतकरी बंधू-भगिनींसाठी मोफत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. यामध्ये जमिनीचा सामू, क्षार विरघळण्याचे प्रमाण, सेंद्रीय कर्ब, नत्र, स्फुरद, पालाश, यांचे प्रमाण या बाबींची तपासणी करून माती तपासणी अहवाल (जमीन आरोग्य पत्रिका) देण्यात येतो. याकरिता आपल्या नजिकच्या आरसीएफ किसान सुविधा केंद्र, आरसीएफ जिल्हा कार्यालय किंवा भूमी परीक्षण प्रयोगशाळेशी संपर्क साधावा.**



*बंधुता निर्माण होण्यासाठी समाजात द्वेष, असुया, उच्च-निच हा भेदभाव असता कामा नये. या तिन्ही गोष्टी नष्ट झाल्याशिवाय राष्ट्राची उभारणी अशक्य आहे.*

*- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर*

# फुलकोबीमध्ये आढळणाऱ्या शारीरिक व्याधी

श्री. संजुला विलास भावर, श्री. वैभव गणेशराव लाजुरकर, उद्यानविद्या विभाग,
डॉ.पं.दे.कृषी विद्यापीठ अकोला - ४४४१०४ मो. ८६००३४४०९७

भारतामध्ये फुलकोबीचे मोठ्याप्रमाणावर उत्पादन होते. याच्या निर्यातीमध्ये भारत एक प्रमुख देश आहे. भारतामध्ये फुलकोबी उत्पादनासाठी अनुकूल वातावरण आहे, मात्र काही अन्नद्रव्ये व वातावरणातील बदलांमुळे या पिकात शारीरिक व्याधी किंवा कमतरता आढळतात.

**अ) बारीक गड्डा तयार होणे (Buttoning) –**

झाडाची वाढ पूर्ण न होताच लहान गड्डा तयार होतो. कधी कधी झाडाची वाढ सामान्य होते मात्र गड्डा लहान तयार होऊन पानांची वाढ जास्त होते.

**कारणे –** १) जुनी किंवा जास्त वयाच्या रोपांची लागवड करणे. २) नत्राची कमतरता असणे. ३) चुकीच्या वाणांची लागवड करणे उदा. लवकर येणाऱ्या जातींची उशिरा लागवड करणे व उशिरा




येणाऱ्या जातींची लवकर लागवड करणे. ४) कीड व रोग यांमुळे झाडाच्या मुळांना इजा होणे. ५) शेतामध्ये पाणी साचून राहणे.

**ब) गड्ड्यांना अकाली फुलोरा येणे (Ricyness)**

यामध्ये गड्डा सैल तयार होतो व तो मखमलीसारखा मऊ व गुळगुळीत दिसतो त्याचबरोबर गड्डा तयार होत असतांना, पूर्ण गड्डा तयार न होता लगेच गड्ड्याच्या वाढीपुर्वी अकाली फुलोरा येतो.

**कारणे –** १) तापमान आवश्यकतेपेक्षा कमी किंवा जास्त असणे. २) नत्राची मात्रा जास्त होणे. ३) वातावरणीय आर्द्रता जास्त असणे.

**उपाय –** ✦ योग्य वेळी योग्य जातींची लागवड करणे ✦ खतांची प्रमाणित व संतुलित मात्रा देणे ✦ प्रतिकारक्षम व सहनशील जातींची लागवड करणे

**क) लाल कुज (Browning) –**

यामध्ये गड्डा मध्यभागी तर खोड आतून भिजल्यासारखे वाटते. अशा खोडाला आतून पोकळी निर्माण होते. ही व्याधी मोठ्या प्रमाणावर वाढत गेली तर गड्ड्यावरती गुलाबी रंगाचा बुरसटल्यासारखा थर येतो आणि या गड्ड्यांना कडवट चव येते त्यामुळे ते खाण्यायोग्य राहत नाहीत.

**कारण –** बोरॉन या अन्नद्रव्याची कमतरता आढळणे.

**उपाय –** ✦ बोरॅक्स किंवा सोडियम बोरेटचा २० किलो प्रती हेक्टर वापर करणे. ✦ जर बोरॉनची खूपच कमतरता असेल तर ०.२५-०.५०% बोरॅक्सच्या द्रावणाचा फवारणीसाठी वापर करणे.

**ड) व्हिपटेल (Whiptail) –** पानांची वाढ योग्य प्रमाणात होत नाही. पाने पट्टीसारखी लहान राहतात. झाडाच्या वरच्या मुख्य वाढणाऱ्या भागाची वाढ खुंटते.

**(पुढील मजकूर पान १५ वर)**




## जपणूक आमची सामाजिक बांधीलकीची ...




**महिला शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम, जिल्हा अमरावती –** आरसीएफ जिल्हा कार्यालय अमरावती यांच्या वतीने खास महिला शेतकऱ्यांसाठी आरसीएफ शेतकरी प्रशिक्षण केंद्र नागपूर येथे आयोजित करण्यात आलेला कृषी प्रशिक्षणाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. यामध्ये मोर्शी तालुक्यातील २८ प्रगतिशील महिला शेतकऱ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे आयोजन आरसीएफचे जिल्हा व्यवस्थापक श्री. ए. बी. ठाकरे व कार्यकारी विपणन प्रतिनिधी श्री. पी. आर. म्हस्के यांनी केले होते.





**कृषी दिन व उत्पादन प्रात्यक्षिक, जिल्हा कोल्हापूर –** शेतकऱ्यांना संतुलित तसेच विद्राव्य खत वापरा विषयी माहिती देण्यासाठी वाळवे खुर्द, तालुका – कागल येथे शेंगदाणा लागवड संदर्भात उत्पादन पीक प्रात्यक्षिक व कृषीदिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. श्री. सुरेंद्र राजेशिर्के, वरिष्ठ विपणन अधिकारी कोल्हापूर यांनी शेतकऱ्यांना आरसीएफच्या मूल्यवर्धित खतांविषयी सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाच्या आयोजनाकरीता मे. महालक्ष्मी फर्टिलायझर्स (किसान सुविधा केंद्र), मे. विठ्ठल फर्टिलायझर्स यांनी सहकार्य केले.





**'अॅग्रो व्हिजन एक्स्पो' नागपूर (कृषी प्रदर्शन) –** येथील कार्यक्रमात आरसीएफ नागपूर कार्यालयाच्या वतीने सहभाग घेण्यात आला. यानिमित्ताने आरसीएफच्या दालनामध्ये खत उत्पादनांची सुयोग्य मांडणी करून शेतकऱ्यांना माहितीपत्रके देऊन चांगल्या प्रकारे मार्गदर्शन करण्यात आले. केंद्रीय मंत्री मा. श्री. नितिन गडकरी, मा. श्री. हंसराज अहिर आदी मान्यवरांनी आरसीएफ दालनाला भेट देऊन आरसीएफच्या कृषी उपक्रमांची प्रशंसा केली. श्री. एम. एच. पटेल, क्षेत्रिय प्रभारी नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. आर. जे. साखरे, जिल्हा प्रभारी नागपूर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी हा कार्यक्रम यशस्वी केला.

**फुलकोबीमध्ये आढळणाऱ्या शारीरिक व्याधी किंवा कमतरता... (पान १३ वरून पुढे)**

यामुळे झाडांना गड्डे येत नाही व फक्त पानांची वेडीवाकडी वाढ होते. व्हिपटेल प्रामुख्याने आम्लयुक्त जमिनीत ज्या जमिनीचा सामू ४.५ पेक्षा कमी आहे अशा जमिनीत आढळतो.

**कारण –** मॉलीब्डेनम या अन्नद्रव्याची कमतरता आढळणे.

**उपाय –** ✦ जिप्समचा वापर करून आम्लयुक्त जमिनीचा सामू ६.५ पर्यंत आणावा ✦ २-२.५ किलो प्रती हेक्टर सोडियम किंवा अमोनियम मॉलीब्डेटचा वापर करावा ✦ ०.५% सोडियम मॉलीब्डेटची फवारणी करावी.

**क) फ्युझिनेस (Fuzziness) –** यामध्ये गड्डा मऊ व पांढराशुभ्र तयार होतो आणि गड्ड्याचा देठ लांब वाढतो.

**कारण –** अयोग्य जातीची निवड उदा. लवकर येणारी जात उशिरा लावणे व उशिरा येणारी जात लवकर लावणे.

**ख) पर्णयुक्त गड्डा –** या शारीरिक व्याधीमध्ये गड्ड्यामध्ये पाने वाढतात. पूर्ण गड्ड्यामध्ये वेगवेगळ्या विभागात लहान-लहान पाने येतात. यामुळे गड्ड्यांचा दिखाऊपणा कमी होतो.

**कारणे –** १) गड्डा तयार होण्याच्या वेळेस तापमान जास्त असणे किंवा तापमानामध्ये चढ-उतार होणे.

**उपाय –** योग्य वेळी योग्य जातीची लागवड करणे.

**ग) अंधत्व किंवा वर वाढणाऱ्या भागाची वाढ न होणे (Blindness) –** रोपांचे प्रत्यारोपण केल्यानंतर अगदी सुरुवातीच्या काळातच झाडाच्या वर वाढणाऱ्या भागाला किडे, कमी तापमान आणि दव यांमुळे दुखापत होते. त्यामुळे झाडांची सामान्यरित्या वाढ होत नाही. ही व्याधी झालेल्या झाडांची बाहेरील पाने कार्बोहायड्रेट साचल्यामुळे जाड व मऊ होतात.

**उपाय –** ✦ कमी तापमान सहन करणाऱ्या जातींची लागवड करणे ✦ योग्य प्रमाणात किटकनाशकांची फवारणी करून किड नियंत्रण करावे ✦ योग्य वेळी योग्य जातींची लागवड करावी.

**घ) हरितरोग (Chlorosis) –** झाडांच्या जुन्या पानांवर पिवळसर रंगाचे ठिपके दिसतात, जर मॅग्नेशियमची कमतरता जास्त प्रमाणात आढळली तर झाडांची वाढ खुंटते व झाडे करपल्यासारखी पिवळसर होतात, अशा झाडांना गड्डा येत नाही.

**कारण –** मॅग्नेशियम या अन्नद्रव्याची कमतरता आढळणे.

**उपाय –** ✦ आम्लयुक्त जमिनीत लागवड करणे टाळावे. ✦ मॅग्नेशियम ऑक्साईडचा वापर करावा किंवा मॅग्नेशियम सल्फेटच्या (२%) २ फवारण्या १५ दिवसांच्या अंतराने कराव्यात. ✦ चुन्याचा वापर करून जमिनीचा सामू ६.५ पर्यंत आणावा. ✦ ज्या खतांमध्ये मॅग्नेशियम असेल अशा खतांचा वापर करावा.

**ड) पोकळ खोड (Hollowstem) –** जास्त सुपीक जमिनीत झाडांची वाढ खूप लवकर होते, मात्र अशा लवकर वाढणाऱ्या झाडांचे खोड व गड्ड्याच्या देठामध्ये पोकळी निर्माण होते यामुळे गड्ड्याचा दिखाऊपणा व टिकवण क्षमता कमी होते.

**कारणे –** १) नत्राची मात्रा जास्त होणे. २) बोरॉनची कमतरता आढळणे.

**उपाय–** ✦ झाडांची लागवड प्रमाणापेक्षा कमी अंतरावर करावी. ✦ नत्राची मात्रा योग्य प्रमाणात द्यावी. ✦ बोरॅक्सचा १५ किलो प्रती हेक्टर याप्रमाणे वापर करावा.

**स्वत: बदला, जग बदलेल!**

ग्लास दुधाने भरला असेल तर त्यात तुम्ही अधिक दूध घालू शकत नाही, परंतु त्यात तुम्ही साखर घातली तर साखर आपली जागा निर्माण करेल. त्याचप्रमाणे चांगली माणसं कुणाच्याही मनात जागा बनवतातच!

# मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना

श्री. अमरसिंह निंबाळकर, सहाय्यक व्यवस्थापक, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ, सातारा
मो. ८६६८६८३८६०

मनुष्याच्या खाद्यपदार्थ सेवन करावयाच्या दैनंदिन सवयी बदलत चाललेल्या आहेत. वाढत्या वेगाने होणारे शहरीकरण, मोठ्या प्रमाणावर असणारा मध्यमवर्गीय व त्यांची खरेदी करण्याची क्रयशक्ती, लवचिक आयात धोरण आणि शासकीय धोरणांमुळे अन्नप्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन मिळत आहे. भारतामध्ये अन्नप्रक्रिया उद्योग हा पाचव्या क्रमांकावरील मोठा उद्योग आहे.

महाराष्ट्राची ६५ टक्के लोकसंख्या कृषी व कृषी संलग्न क्षेत्रांशी जोडलेली आहे. राज्यात प्रामुख्याने भात, ज्वारी, बाजरी, गहू तसेच तूर, मूग, उडीद, हरभरा व इतर डाळींचे उत्पादन होते. राज्यात भुईमूग, सूर्यफुल, सोयाबीन ही प्रमुख तेलबीयापिके आहेत. ऊस, कपाशी आणि हळद ही प्रमुख नगदी पिके आहेत. महाराष्ट्र राज्य वेगवेगळ्या फळ उत्पादनामध्ये देशामध्ये आघाडीवर आहे. त्यामध्ये आंबा, केळी, संत्रा, द्राक्षे, डाळींब, पेरु, कलिंगड इत्यादी फळे आहेत. तसेच भाज्यांमध्ये टॉमॅटो, बटाटे, भेंडी, वांगी, कोबी इत्यादींचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होते.

भारतात द्राक्षापासून मद्यनिर्मिती महाराष्ट्रामध्ये केली जाते. तसेच आंबा, कांदा, कडधान्य व तेलबियांवर काही प्रमाणावर अन्नप्रक्रिया होते. द्राक्ष, संत्रा, डाळींब, काजू, स्ट्रॉबेरी, टॉमॅटो, ऊस आणि दुग्धोत्पादन, मासेमारी, कुक्कुटपालन यांचे मोठ्या प्रमाणावर होणारे उत्पादन ही राज्याची ओळख आहे. महाराष्ट्र राज्य जरी निरनिराळी पिके, फळपिके, यांच्या उत्पादनामध्ये आघाडीवर असले तरी, प्रक्रियाउद्योग, कापणीनंतरच्या पायाभूत सोयी यांची कमतरता असल्याने मोठ्या प्रमाणावर होणारी अन्नाची नासाडी टाळण्यासाठी तसेच प्रक्रिया उद्योगास चालना देण्यासाठी राज्यपुरस्कृत 'मुख्यमंत्री कृषी व अन्नप्रक्रिया योजना' सन २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून पुढील पाच वर्षाकरिता लागू करण्यात आलेली आहे. प्रतिवर्षीसाठी आर्थिक तरतूद या योजनेकरिता उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**कृषी व अन्नप्रक्रिया प्रस्थापना स्तरवृध्दी व आधुनिकीकरण योजनेची उदिष्टे :**

- शेतीमालाचे मुल्यवर्धन करण्याकरिता शेतकऱ्यांच्या सहभागाद्वारे आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित प्रकल्प स्थापित करण्यास प्रोत्साहन देणे.
- अन्नप्रक्रियेद्वारे उत्पादित मालाची ग्राहकांमध्ये पसंती निर्माण करणे, बाजारपेठ निर्माण करणे व निर्यातीस प्रोत्साहन देणे.
- कृषी व अन्नप्रक्रियेकरिता मनुष्यबळ निर्मिती करणे.
- ग्रामीण भागात लघू व मध्यम अन्नप्रक्रिया उद्योगांना प्राधान्य देणे आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे.

**पात्र उद्योग :** फळे, भाजीपाला, अन्नधान्य, कडधान्य, तेलबिया उत्पादने, इत्यादी प्रक्रिया उद्योग.

**पात्र संस्था :** फळे, भाजीपाला, अन्नधान्य, कडधान्ये, तेलबिया उत्पादने इत्यादीवर आधारीत अन्नप्रक्रिया प्रकल्प चालविणारे किंवा स्थापित करीत असलेले शासकीय किंवा सार्वजनिक उद्योग, सक्षम शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतकरी गट, महिला स्वयं सहायता बचत गट, खाजगी उद्योग क्षेत्र, ग्रामीण बेरोजगार युवक, सहकारी संस्था यांच्या शेतमाल प्रक्रियेच्या प्रकल्पांना प्राधान्य देण्यात येते.

**आर्थिक सहाय्य :**

- कारखाना व यंत्रे (Plant and Machinery) आणि प्रक्रिया प्रकल्पांसाठी आवश्यक दालने

(Civil work for housing processing unit) यांच्या बांधकाम खर्चाच्या ३० टक्के अनुदान कमाल मर्यादा रु.५० लाख.

- या योजनेअंतर्गत अनुदान 'क्रेडीट लिंक बँक एडेड सबसिडी' च्या तत्वांनुसार दोन समान वार्षिक हप्त्यांत अ) प्रकल्प पुर्ततेनंतर व ब) पूर्णक्षमतेने उत्पादनात आल्यानंतर देण्यात येईल.
- प्रकल्पांना मंजूर करण्यात येणाऱ्या अनुदानाच्या रक्कमेपेक्षा कर्जाची रक्कम किमान दीड पट असावी.

**आवश्यक कागदपत्रे:**

- नमूद केल्यानुसार विहित नमुन्यात अर्ज सादर करावेत.
- तपशिलवार प्रकल्प अहवाल (डीपीआर)
- बँक किंवा वित्तीय संस्थाकडील प्रकल्पाचा मंजुरी अहवाल.
- बँक किंवा वित्तीय संस्थाकडील मुदतीचे कर्ज मंजुरी पत्र.
- प्रकल्पाचे नोंदणी प्रमाणपत्र.
- संस्थेची नियमावली आणि जेथे लागू असेल तेथे सोसायटीची नियमावली किंवा भागीदारी प्रकल्पाचा करारनामा.
- प्रकल्पधारकाचा बायोडाटा, पार्श्वभूमी, प्रवर्तक संस्थेविषयी माहिती.
- वार्षिक अहवाल आणि मागील तीन वर्षाचे ऑडीट स्टेटमेंट, विस्तारविषयक आणि स्तर उंचविण्या संदर्भातील प्रस्ताव.
- इमारतीची ब्ल्युप्रिंट.
- जमिनीच्या संदर्भात नोटराईज डॉक्युमेंट.
- बाबनिहाय आणि किंमतीनिहाय तपशिलवार माहिती - तांत्रिक सिव्हील बांधकाम चार्टर्ड इंजिनिअर (सिव्हील) यांनी प्रमाणित केलेली.
- बाबनिहाय आणि किंमतीनिहाय तपशिलवार माहिती - प्लॅन्ट आणि मशीनरीबाबत चार्टर्ड इंजिनिअर (मेकॅनिकल) यांनी प्रमाणित केलेली.
- पुरवठादाराकडील प्रकल्पांसाठी लागणारी प्लॅन्ट मशीनरी आणि साहित्यांची दरपत्रके सादर करणे.
- बाजारपेठेविषयी माहिती.
- कृषी प्रक्रिया प्रकल्पाचा फ्लो डायग्राम.
- एसएसआय/आईएम नोंदणी प्रमाणपत्र.
- प्रकल्प राबविण्याचे वेळापत्रक.
- जमीन अधिकृत केल्याची, इमारतीचे बांधकाम सुरु करण्याची, बांधकाम पूर्णत्वाची, प्लॅन्ट आणि मशीनरी उभारणीची, प्रायोगिक तत्वावर उत्पादन सुरु करण्याची, व्यापारी तत्वावरील उत्पादन सुरु करण्याची, प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरु करण्याची तारीख याविषयी माहिती.
- १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र नोटराईज करुन सादर करणे.
- संस्थेचे भागीदार, संबंधित कंपन्या किंवा कंपन्यांचा समूह त्याचप्रमाणे कंपनी मालक (स्वत:) यांनी अन्नप्रक्रिया प्रकल्पांसाठी आर्थिक अनुदान अन्नप्रक्रिया मंत्रालयाकडून मिळाले किंवा नाही त्याची तपशिलवार माहिती सादर करणे.
- पूर्वी संबंधित संस्थेने अनुदान मिळण्यासाठी केंद्रीय कृषी मंत्रालय / केंद्र सरकार/ केंद्र शासनाच्या संस्था / यंत्रणा / राज्य शासन/ यांच्याकडे प्रक्रिया उद्योगांसाठी संस्थेला अनुदान मिळण्यासाठी सादर केलेला तपशिल असेल तर सादर करावा.

**शीतसाखळी, मूल्यवर्धन आणि साठवणुकीच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्याची योजना :**

शेतकऱ्यांच्या शिवारापासून ते ग्राहकांपर्यंत किंवा उत्पादन क्षेत्र ते बाजारपेठपर्यंत एकात्मिक आणि पूर्ण शीतसाखळी आणि साठवणुकीच्या सुविधा निर्माण करणे हा याचा उद्देश आहे. या योजनेअंतर्गत उत्पादनाचे ठिकाणी, प्रिकुलींग सुविधा, रेफर व्हॅन आणि फिरत्या शीतगृहासाठी अनुदान दिले जाईल. उत्पादकांचा समूह एकत्रित करण्यासाठी व सुसज्ज पुरवठा साखळी उत्पादक आणि बाजारपेठ या करिता उपयोग करणे.

सक्षम महिला स्वयंसहाय्यता गट, सक्षम शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी गट, उद्योग क्षेत्र, ग्रामीण बेरोजगार युवक, सहकारी संस्था इत्यादींच्या अन्नप्रक्रिया प्रकल्पांपैकी फळे व भाजीपाला सारख्या नाशवंत शेतमालाच्या प्रक्रियेच्या प्रकल्पांना प्राधान्य देण्यात येते. फळे व भाजीपाला, अन्नधान्य, कडधान्य, तेलबिया, इत्यादीवर आधारीत प्रक्रिया करणारे किंवा स्थापित करीत असलेले शासकीय व सार्वजनिक उद्योग या योजनेकरिता पात्र आहेत. शासनातर्फे या योजनेला सुद्धा आर्थिक सहाय्य देण्यात येते.

संस्था किंवा अर्जदाराने विहित प्रपत्रात त्यांचा अर्ज राज्यस्तरीय निवड समितीकडे अनुदान मिळण्याकरिता सादर करणे आवश्यक आहे. निवड समिती कृषी प्रक्रिया प्रकल्पाचे प्रस्ताव विचारात घेऊन प्रकल्पास अनुदान मंजूर करेल.

यासाठी राज्यातील इतर नामांकित संस्था / केंद्र / राज्य शासनाच्या राष्ट्रीय पातळीवरील प्रशिक्षण संस्थांमार्फत प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मिती केली जाते.


**आरसीएफ सेंद्रिय खत (सीटी कंपोस्ट)**

**जमिनीचे म्हणजेच पर्यायाने मातीचे आरोग्य चांगले राखण्याच्या दृष्टीने सेंद्रिय खतांचा वापर ही निर्विवाद गोष्ट आहे. जमिनीच्या सर्व आजारांचे मूळ कारण म्हणजे जमिनीमध्ये असलेली सेंद्रिय कर्बाची कमतरता! स्वच्छ भारत अभियानांतर्गत निर्मिती व आरसीएफ तर्फे विपणन करण्यात येणारे 'आरसीएफ सेंद्रिय खत' (City Compost) म्हणजे एक उत्कृष्ट सेंद्रिय उत्पादन आहे. हे खत काडीकचरा, टाकाऊ फळे, भाजीपाला व खाद्यपदार्थ इत्यादींवर जैविक प्रक्रिया करून तयार करण्यात येते. जमिनीच्या निरोगीपणासाठी आणि उत्पादन वाढीसाठी हे एक उत्कृष्ट खत आहे.**

**सेंद्रिय व रासायनिक खतांचा समतोल वापर केल्याने कृषी उत्पादनात निश्चितपणे वाढ होते हे प्रयोगांती सिद्ध झालेले आहे.**


## कांदा चाळ उभारणी साठवणुकीसाठी वरदान...

(पान १० वरून पुढे)

- ५० टक्के माना मोडल्यानंतर लगेच कांद्याची काढणी करावी. कांदे पात व मुळासकट शेतात ओळीने पसरवून सुकवावेत. मागच्या ओळीतील कांद्याच्या पातीने पुढच्या ओळीतील कांदे झाकून जातील अशा बेताने कांदे एकसारखे शेतात पसरावेत, त्यामुळे उघड्या रानात कांदे उन्हाने खराब न होता त्यातील पाण्याचा अंश कमी होण्यास मदत होतो. काढणीनंतर कांदा शेतात तीन ते पाच दिवस पातीसकट व्यवस्थित सुकवावा, त्यानंतर मानेची ठराविक लांबी ठेवून (तीन ते पाच सें.मी.) पीळ देऊन पात कापावी. ही प्रक्रिया साठवणुकीच्या कांद्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरते. पीळ देऊन माना कापल्यास त्यामध्ये रोगजंतूंचा शिरकाव होण्यास प्रतिबंध होतो.
- मान कापलेला कांदा झाडाखाली सावलीत पसरून चांगला सुकवावा. सावलीमध्ये सुकविलेल्या कांद्यास दुहेरी पापुद्रा येऊन आकर्षक रंग प्राप्त होतो.
- कांदा पूर्ण सुकलेला आहे किंवा नाही याची खूण म्हणजे त्यातील तीन ते पाच टक्के पाण्याचा अंश कमी झाला पाहिजे.
- मान बारीक होऊन पूर्णपणे मिटलेली असावी. कांदा घट्ट आणि वरचा पापुद्रा सुकून त्याचा रंग आकर्षक झाला पाहिजे.

### साठवणूकीपूर्वीची प्रतवारी व हाताळणी :

- कांदा सुकविल्यानंतर साठवणुकीपूर्वी कांद्याची प्रतवारी करणे खूप महत्त्वाचे असते. रोगट व इजा झालेले कांदे साठवणूकीत इतर कांद्यांचे नुकसान करतात, त्यामुळे कांदा साठवणूकीत प्रतवारी करणे महत्त्वाचे आहे.
- रोगट व इजा झालेले, जाड मानेचे, चिंगळी, जोड कांदे आणि डेंगळे असलेले कांदे बाजूला

करावेत आणि त्वरित बाजारात विक्रीसाठी पाठवावेत.

- सर्वसाधारण काढलेल्या कांद्याची मोठा (सहा सें.मी. व्यास आणि वरचे), मध्यम (चार ते सहा सें.मी. व्यासाचे) व लहान (दोन ते चार सें.मी. व्यासाचे) अशा रीतीने तीन गटांत प्रतवारी करावी.
- लहान तसेच मोठ्या आकाराच्या कांद्यामध्ये जास्त प्रमाणात वजनात घट येते, त्यामुळे मध्यम आकाराचे कांदे साठवणुकीसाठी वापरणे योग्य असते, तर उर्वरित आकारमानाच्या कांद्याचे जुलै - ऑगस्टपर्यंत विक्रीचे नियोजन करावे.

**शास्त्रोक्त सुधारित चाळीमध्ये कांदा साठवणूक :**

- शास्त्रोक्त पद्धतीने कांदा साठवण केल्यास साठवणुकीतील नुकसान २५ टक्क्यांवरून पाच टक्क्यांपर्यंत कमी करता येते. कांदा चांगला सुकवून कांदाचाळीत भरला की तो पाच महिने चांगला टिकतो.
- कांदा साठवणुकीसाठी शास्त्रोक्त पद्धतीने उभारलेल्या कांदाचाळीचा वापर करावा, ज्यामध्ये नैसर्गिक वायुविजनाचा वापर करून कांदाचाळीतील तापमान २५ ते ३० अंश व आर्द्रता ६५ ते ७० टक्के या मर्यादेत ठेवून साठवणुकीतील नुकसान कमी करता येते.
- कांदाचाळीची आतील रुंदी जास्तीत जास्त चार फूट असावी. रुंदी वाढली तर वायुविजन नीट होत नाही. थरातील मध्यावरील कांदे सडतात.
- जमिनीपासून दीड ते दोन फूट मोकळी जागा ठेवून कांदा साठवण ठेवावी. तळासाठी अर्धगोल बांबू वापरावा. काँक्रिटचा वापर करू नये. तळाशी दोन ते तीन फूट माती काढून रेतीचा थर द्यावा. खालच्या मोकळ्या जागेतून रात्री थंड हवा चाळीत शिरते व गरम झालेली हवा चाळीच्या वरच्या त्रिकोणी भागात जमा होऊन बाहेर जाते.
- कांदाचाळीच्या दोन्ही बाजूस उभ्या भिंतीसाठी बांबू, जंगली लाकूड किंवा पऱ्हाट्या इत्यादी साहित्याचा वापर करावा, तर छतासाठी सिमेंट पत्रे किंवा मंगलोरी कौले यांचा वापर करावा. शक्यतोवर टीन पत्र्यांचा वापर करू नये.
- कांदाचाळीच्या छतावर उन्हाळ्यात आच्छादनासाठी गवत, उसाचे पाचट अथवा ज्वारीचा कडबा यासारख्या उष्णतारोधक साहित्याचा वापर करावा, जेणेकरून आतील तापमान नियंत्रित ठेवण्यास मदत होईल.
- कांदाचाळीची उभारणी करताना उंच व मोकळ्या जागेवर करावी, तसेच पत्र्यांना पुरेसा ढाळ देऊन दोन मीटरपर्यंत पत्रे बाहेर काढावेत, त्यामुळे पावसाळ्यात पाण्याच्या ओसांड्यापासून बचाव होतो.
- कांदाचाळीस मध्यभागी अधिक उंची व जास्त उतार दिल्यास चाळीमध्ये हवा जास्तीत जास्त खेळती राहून पावसाळ्यात आतमध्ये आर्द्रता साठत नाही.
- कांद्यावर सरळ सूर्यप्रकाश येण्याचे टाळावे, त्यामुळे कांद्याचा रंग फिका पडतो व गुणवत्ता खालावते, त्यामुळे दुपाखी कांदाचाळीची उभारणी पूर्व-पश्चिम, तर एकपाखी कांदाचाळीची उभारणी दक्षिण-उत्तर अशी करावी. शक्यतोवर बाहेरील बाजूस शेडनेटचा वापर करावा.
- साठवणुकीपूर्वी, साठवणुकीनंतर तसेच मधून-मधून कांदाचाळ व परिसर निर्जंतुक करून घ्यावा म्हणजे सड कमी होते.
- कांदाचाळीमध्ये कांद्याची साठवणूक उंची चार ते पाच फुटांपेक्षा जास्त असू नये. उंची वाढल्यामुळे तळातील कांद्यावर वजन वाढते,

हवा खेळती राहत नाही,त्यामुळे विशेषतः खालील थरातील कांद्याचे नुकसान होते.

★ साठवणुकीसाठी निवड केलेला कांदा, साठवणूकगृहाची रचना या दोन्ही बाबी शास्त्रोक्त पद्धतीने अमलात आणल्यास कांदा चार-पाच महिने चांगल्या रीतीने सुरक्षित राहू शकतो. ऑगस्ट ते ऑक्टोबर या महिन्यांत त्यांच्या विक्रीचे नियोजन केल्यास शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या अधिक उत्पन्न या साठवणूक केलेल्या कांद्यापासून मिळू शकते.



प्राचीन काळापासून भोजनात कांद्याचा उपयोग केला जात आहे. भारतात कांद्याची लागवड बऱ्याच राज्यांमध्ये केली जाते. रेताड व कोरडवाहू जमीन या पिकाला अधिक मानवते. आता या पिकामध्ये अधिक उत्पन्न देणाऱ्या सुधारित व संकरित जाती निर्माण केल्या गेल्या आहेत. आरोग्याच्या दृष्टीने कांदा खुप महत्त्वाचा आहे. याचे अनेक औषधी उपयोग आहेत. पांढरा कांदा गुणवत्तेच्या दृष्टीने उत्तम असतो. लाल कांद्यामध्येसुद्धा लोह तत्वाचे प्रमाण अधिक असते. खोकला व श्वास दम्याचा जोर कांद्याच्या सेवनाने कमी होतो. कांद्याच्या सेवनाने कफ पातळ होतो. नाकात कांद्याच्या रसाचे थेंब टाकल्यास रक्त येण्याचे बंद होते. कांदा मेंदू व हृदयासाठी हितावह आहे. वात विकार असणाऱ्यासाठी कांदा रामबाण उपाय आहे.

कांदा व दुधाचे एकत्र सेवन करणे हा विरोधी आहार आहे. दुध व कांदा सेवनामध्ये कमीतकमी चार तासांचे अंतर असणे आवश्यक आहे. दुध पिण्यापुर्वी किंवा नंतर लगेचच कांदा खाण्याने रक्त दोष निर्माण होतो. शास्त्रिय मताप्रमाणे कांदा उष्ण, हलका, कडूसर, उत्तेजक, सारस, कफघ्न आणि मूत्रल आहे.

## कृषीसल्ला

- ☑ द्राक्ष पीकासाठी जमीन निवडताना चुनखडीचे प्रमाण ८ टक्क्यापेक्षा जास्त असू नये. सामू ६.२ ते ७.५ च्या दरम्यान असावा. पीकाची लागवड दक्षिणोत्तर करावी
- ☑ खुंटावरील लागवड करताना 'डॉगरीज' या खुंटाची शिफारस करण्यात आली आहे. या खुंटावर योग्य जातीचे पाचर पद्धतीने कलम करावे.
- ☑ द्राक्ष पिकाच्या सुधारित जाती- थॉमसन सिडलेस, तास-ए-गणेश, सोनाका, माणिक, चमन, शरद सिडलेस, रेड ग्लोब इत्यादी.
- ☑ गुणवत्तात्मक द्राक्ष उत्पादनासाठी खत व जल व्यवस्थापनाबरोबरच विरळणी, गर्डलिंग, योग्य कॅनोपी व्यवस्थापन व योग्य संजिवकांचा वापर करावा.
- ☑ डाळिंबाच्या सुधारित जाती : गणेश, मृदुला, फुले आरक्ता, सोलापूर लाल, फुले भगवा, इत्यादी.
- ☑ डाळिंबाची लागवड करण्यापूर्वी मातृवृक्ष तेलकट डाग तसेच मर रोग मुक्त असल्याची खात्री करावी.
- ☑ लागवड - १५×१० फूट अंतरावर करावी. रोपे कॅल्शियम हायपोक्लोराईड (१०० ग्रॅम प्रती खड्डा) ने निर्जुंतुक केलेल्या खड्ड्यात लावावीत.
- ☑ डाळिंब झाडांच्या लागवडीनंतर सुरवातीची दोन वर्षे ओळीमध्ये कांदा, मूग, चवळी, सोयाबीन या पिकांची आंतरपीक म्हणून लागवड करावी. वेलवर्गीय किंवा वांगीवर्गीय पिके घेऊ नयेत.
- ☑ द्राक्ष किंवा डाळिंब लागवडीचा निर्णय घेण्यापूर्वी त्या संबंधीत प्रगतिशील बागायतदार व कृषी तज्ञांचे मार्गदर्शन अवश्य घ्यावे.



### ग्राफिटी



शब्दाने शब्द वाढतो म्हणून आम्ही तोंडी परिक्षेच्या वेळी शांत बसायचो!!!

सरडा जागेनुसार रंग बदलतो आणि माणूस वेळेनुसार!

# विचार जलसंवर्धनाचा

प्रा. मनोहर थारकर, मुंडगाव, तालुका - अकोट, जिल्हा - अकोला, मो. ९८२२९२०११९

जलसंधारण खात्याची निर्मिती झाल्यापासून 'पाणी अडवा पाणी जिरवा' चळवळीला गती आली. आता शेतकऱ्यांनाही जलसंवर्धनाचे महत्त्व कळून येत आहे. आपल्याकडे अनेकदा संधी दवडली जाते आणि नंतर पश्चाताप करण्याची पाळी येते. तथापि, आज आपण पूर्व अनुभवांतून शहाणे होऊन बऱ्यापैकी 'जलसाक्षर' झालो आहोत. जनता म्हणून आपल्याला 'जलजाण' आली आहे आणि राज्य म्हणूनही सुयोग्य 'जलसमज' आली आहे. आता हळूहळू का होईना आपण 'जलश्रीमंत' होऊ या! त्यासाठी आगामी दिलासादायी मान्सूनचं 'जल वरदानात' रूपांतर करूया!

जल साठवणूक जेवढी भूपृष्ठावर शक्य आहे तेवढी तर करावीच, परंतु त्याहीपेक्षा किती तरी अधिक प्रमाणात भूगर्भात साठवणूक झाली पाहिजे. यासाठी शक्य होईल तसे आणि शक्य होईल तितके अधिकाधिक पर्जन्यजल भूपृष्ठावर अपरिहार्यपणे, अगत्याने, अग्रक्रमाने व आग्रहपूर्वक साठवावे आणि भूगर्भातही मुरवावे, जिरवावे आणि साठवावे. हे जल जमिनीच्या पोटात बँकेतील ठेवीप्रमाणे आगामी काळात हवे तेव्हा हवे तसे उपयोगी पडणारे असते. त्यासाठी हे पाणी प्रथम अडवावे लागेल आणि मूलस्थानी जिरवावे लागेल. यामध्ये शेतकऱ्यांची भूमिका जास्त महत्त्वाची आहे. शेतकरी स्वतःसाठी स्वतःच्या शेतात किती पाऊस अडवू शकतो आणि जिरवू शकतो हे महत्त्वाचे आहे. दुर्दैवाने आपल्याकडे शेतकऱ्यांसाठी अशा वैयक्तिक योजना नाहीत. म्हणूनच शेतकरी या नात्याने आपण स्वतः आपापल्या शेतात स्वतंत्रपणे पाणी अडवण्यासाठी आणि पाणी जिरवण्यासाठी काही व्यवस्था करू शकतो का? याचा प्रत्येक शेतकऱ्याने विचार करून शक्य असल्यास वैयक्तिकरित्या किंवा सामुहिकरित्या प्रयत्न केला पाहिजे. त्याशिवाय केवळ यावरच अवलंबून न राहता हाताशी भरपूर वेळ, संधी व नियोजन व्यवस्था असल्यास कल्पकतेने आणखी जास्तीचे काही तरी नक्की केले पाहिजे. अपेक्षित असलेल्या वरूण राजाच्या कृपाशिर्वादाला आपण पक्क्या कोंदणात साठवून ठेवले पाहिजे. म्हणूनच सुदैवाने भरपूर प्रमाणात मिळण्याची शक्यता असलेले आगामी पावसाचे पाणी मनमानी, मनसोक्त वाहून जाऊ देऊ नये यासाठी 'पाणीदार' प्रयत्न करण्याची गरज आहे!

साठवणूक केलेल्या धरणांचे पाणी शेतकऱ्यांसाठी रब्बी आणि बागायती पिकांना मिळू शकते. त्यामुळे या वर्षी खरीप व रब्बी अशी दोन पिके हमखास घेण्याची तयारी व व्यवस्था शेतकऱ्यांनी आतापासून करून ठेवली पाहिजे. ज्या ठिकाणी सिंचन व्यवस्था नसल्यामुळे नुसती कोरडवाहू शेती आहे त्यांनाही मान्सूनचा पाऊस समाधानकारक झाल्यास कोरडवाहू पद्धतीने येणारी खरीप व कोरडवाहू रब्बी अशी दोन पिके घेता येण्याची शक्यता आहे. त्यांनीसुद्धा खरिपासोबत योग्य वेळी रब्बी पीक घेण्याच्या तयारीत असले पाहिजे. शासनानेसुद्धा शेतकऱ्यांना प्रेरणा प्रोत्साहित करण्यासाठी आतापासूनच नियोजन करून प्रयत्नाला लागले पाहिजे.

पावसाची अनुकूल सरासरी डोळ्यासमोर ठेवून राज्यातील तमाम शेतकऱ्यांनी या सुवर्ण संधीचा शेतीसाठी, पिकोत्पादनासाठी उपयोग करून घेतला पाहिजे. कुठली पिके घ्यावी, घेऊ नयेत याचे अभ्यासपूर्वक नियोजन केले पाहिजे. यासाठी त्यांनी कृषी विभाग, कृषी विद्यापीठे, कृषी तज्ज्ञ, विचारवंत, अभ्यासक इत्यादींची मदत, मार्गदर्शन घेतले पाहिजे. या विविध तज्ज्ञ मंडळींनीसुद्धा शेतकऱ्यांपर्यंत पोहचले पाहिजे. मेळावे घेतले पाहिजेत. शेतकऱ्यांचे प्रबोधन, उद्बोधन केले पाहिजे. जेणेकरून पाऊसपाण्याची अनुकूलता शेतकऱ्यासाठी फायद्याची ठरेल.

## कृषीतज्ञ लेखकांसाठी आवाहन

'आरसीएफ शेतीपत्रिका' हे मासिक गेल्या ५० वर्षांहून अधिक काळ शेतकऱ्यांसाठी अविरतपणे प्रकाशित होत आहे. महाराष्ट्र कर्नाटक, गोवा, तेलंगाना आदी राज्यातील अगदी खेडेगावांतील मराठी भाषिक शेतकऱ्यांपर्यंत आधुनिक शेतीचे तंत्रज्ञान, नवनवीन संशोधित बियाणे, रासायनिक खतांचा संतुलित वापर इत्यादी विविध कृषी विषयांवरील माहिती पोहोचविण्याचा प्रयत्न या शेती पत्रिकेच्या माध्यमातून केला जात आहे. आपणास नम्र विनंती आहे की ह्या अनुषंगाने आपण पीक लागवडीची सुधारित पद्धती, मजूरी खर्चात बचतीचे पर्याय, रोग कीड नियंत्रणाचे नवीन उपाय, उत्पादन गुणवत्ता सुधारण्याचे नवे तंत्र, खत-पाणी व्यवस्थापन, कृषीमाल विपणन व्यवस्थापन, परदेश कृषीअभ्यास दौऱ्यातील अनुभव, शेतकरी यशोगाथा, कृषी जोडधंदे आदी शेती विषयांवर लेख लिहून आमच्या मुंबई कार्यालयाच्या वरिष्ठ व्यवस्थापक (सीआरएम) राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लि. इस्टर्न एक्सप्रेस हायवे, प्रियदर्शिनी बिल्डिंग, आठवा मजला, सायन, मुंबई -४०००२२ या पत्त्यावर किंवा crmrcf@gmail.com या इ- मेल वर पाठवल्यास त्यास यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल.

**लेखन संदर्भात काही सूचना :** ➲ शेतकऱ्यांसाठी कृषी विकासाच्या दृष्टीने उपयुक्त, शास्त्रीय स्वरूपाचे असलेले, शेती व शेती संबंधित विषयांवरील सविस्तर माहितीचे, नावीन्यपूर्ण लेख आरसीएफ शेती पत्रिकेसाठी पाठवावेत. ➲ लेखन संदर्भात फोटो (Images) असल्यास सोबत जोडावेत. ➲ लागवड विषयक लेख, हंगामापूर्वी किमान दोन महिने आधी पोहोचतील अशा बेताने पाठवावेत. ➲ लेख भाषांतरित असल्यास मूळ लेखकाचे नाव व पूर्वी प्रसिद्ध झालेल्या नियतकालिकाचे नाव द्यावे. ➲ एकाच वेळी अनेक नियतकालिकांना, वर्तमानपत्रांना पाठविलेले किंवा इतरत्र प्रसिद्ध झालेले लेख पाठवू नयेत. आरसीएफ शेतीपत्रिकेसाठी स्वतंत्रपणे लिहिलेले लेखच पाठवावेत. ➲ लेख कागदाच्या एका बाजूने समास सोडून सुवाच्य अक्षरात लिहिलेला किंवा टाईप केलेला असावा. ➲ लेखासोबत लेखकाचा पूर्ण पत्ता, मोबाइल क्रमांक व इ-मेल देणे आवश्यक आहे. ➲ पसंत लेख हंगामनिहाय व जागेच्या उपलब्धते नुसार प्रसिद्ध केले जातात. प्रसिद्ध झालेल्या लेखांना योग्य मानधन दिले जाते. ➲ एकापेक्षा अधिक लेखक असतील तर प्रथम क्रमांकाच्या एका लेखकाच्या नावे मानधन ECS द्वारे त्यांच्या बँक खात्यावर जमा केले जाते. ➲ आलेले सर्वच लेखनसाहित्य स्वीकारणे शक्य नसते. कृपया त्यासाठी नाराज होऊ नये. अस्वीकृत लेखाबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जात नाही. शक्यतो लेखाची सत्यप्रत ठेऊनच लेख पाठविणे.

– संपादकीय समन्वयक, आरसीएफ शेतीपत्रिका.
राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लि. मुंबई.
संपर्क फोन क्र. : ०२२-२५५२३०२२.



## Inspiring Thought !

**Ego is lack of self respect.**

In any situation if we react aggressively or get hurt, it is our ego. If we remain stable and have faith in ourselves, it is self respect.

## मास पंचांग

एप्रिल २०१९, फाल्गुन शके १९४० चैत्र शके १९४१

| | |
|---|---|
| शनिवार दि. ६.४.२०१९ | गुढीपाडवा |
| गुरूवार दि. ११.४.२०१९ | महात्मा ज्योतिबा फुले जयंती |
| शनिवार दि. १३.४.२०१९ | रामनवमी |
| रविवार दि. १४.४.२०१९ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती |
| बुधवार दि. १७.४.२०१९ | महावीर जयंती |
| शुक्रवार दि. १९.४.२०१९ | हनुमान जयंती / गुडफ्रायडे |
| मंगळवार दि. ३०.४.२०१९ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती |

## आधुनिक म्हणी

- *वशिल्याच्या नोकरीला इंटरव्ह्यू कशाला?*
- *काटकसर करून जमवलं आणि इन्कम टॅक्समध्ये गमवलं!*
- *मनोरंजन नको पण रिंगटोन आवरा!*

मेरे अच्छे वक्त ने दुनियाको बताया की मैं कैसा हुँ,
और मेरे बुरे वक्तने मुझे बताया की दुनिया कैसी है।

शेती पत्रिकेत प्रसिद्ध होत असलेल्या लेखांत जी मते व्यक्त केली आहेत ती संबंधित लेखक-लेखिकांची आहेत. त्या मतांशी व्यवस्थापन सहमत असेलच असे नाही.
– संपादक, आरसीएफ शेती पत्रिका.

# जपणूक आमची सामाजिक बांधीलकीची ...





**कृषी मेळावा, जिल्हा रत्नागिरी –** आररसीएफ जिल्हा कार्यालय रत्नागिरी, गांगोदेव शेतकरी मंडळ वेल्ये आणि कोंकण विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने वेल्ये तालुका राजापूर येथे कृषी मेळावा उत्साहात संपन्न झाला. यावेळी **डॉ. नीलेश मालेकर,** कृषी शास्त्रज्ञ कृषी विज्ञान केंद्र कराड(सातारा), **श्री. मिलिंद आंगणे,** उप व्यवस्थापक (सीआरएम–विपणन) आरसीएफ मुंबई, **श्री. महेश महाले,** कृषी विज्ञान केंद्र लांजा यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून त्यांच्या शंका–समस्यांचे निराकरण केले. कार्यक्रमाचे आयोजन **श्री. नंदकिशोर मर्गज,** वरिष्ठ विपणन अधिकारी रत्नागिरी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केले होते.






**कृषी मेळावा, जिल्हा बुलढाणा –** आरसीएफ कार्यालय बुलढाणातर्फे गांव अंबोडा ता. नांदुरा येथे कृषी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. **प्रा.अनिल गाभणे, प्रा. शशांक दाते** (कृषी विज्ञान केंद्र जळगांव, जामोद) यांनी शेतकऱ्यांना विविध पिकांच्या लागवडीविषयी मार्गदर्शन केले. **श्री. नितिन पानझाडे,** जिल्हा प्रभारी बुलढाणा यांनी माती परीक्षण, संतुलित खत वापराबाबत सविस्तर माहिती दिली. यावेळी शेतकऱ्यांकडून ७० माती नमूने तपासणीसाठी स्विकारण्यात आले. ही तपासणी मोफत करून दिली जाणार आहे. कार्यक्रमासाठी **श्री. ज्ञानेश्वरदादा पाटील,** अध्यक्ष माऊली अभियांत्रिकी महाविद्यालय शेगांव, **डॉ. ज्ञानेश्वर मिरगे, श्री. विजय कुलकर्णी, सौ. सुनिता बावस्कर** आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचा १५० हून अधिक शेतकऱ्यांनी लाभ घेतला.






**खत विक्रेता प्रशिक्षण कार्यक्रम, जिल्हा नाशिक –** क्षेत्रिय कार्यालय नाशिक अंतर्गत आरसीएफ खत विक्रेत्यांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. **श्री. अतुल पाटील,** उप महाव्यवस्थापक (विपणन) आरसीएफ लि. यांनी खत विपणननीती, थेट लाभ हस्तांतरण योजना (DBT) याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. **श्री. रमेश भताने,** कृषी सह संचालक नाशिक यांनी खत निविष्ठा गुणवत्ता, विक्री करतानाचे नियम याची उपयुक्त माहिती दिली. **श्री.मोहन वाघ,** उप संचालक (कृषी), **श्री. उल्हास ठाकूर,** गुणनियंत्रण अधिकारी नाशिक, **श्री.प्रसाद अणावकर,** क्षेत्रिय प्रभारी नाशिक, **श्री. योगेश वेंगुर्लेकर,** जिल्हा प्रभारी नाशिक यांचेही खत विक्रेत्यांना मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमासाठी नाशिक, धुळे, जळगांव आणि नंदुरबार जिल्ह्यांचे खत विक्रेते तसेच संबंधित आरसीएफ जिल्हा प्रभारी उपस्थित होते.

RNI NO. MAHMAR/2009/32806
Date of Publication 1st of every month. Postal Regd. No. MNE/164/2019-21
Posted at Mumbai Patrika Channel on 10th & 11th of every month




हे मासिक मुद्रक व प्रकाशक श्री. शिरीष गंगाधर भोगले यांनी मालक राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लि. मुंबई यांच्यासाठी मे. सॅप प्रिंट सोल्युशन्स प्रा. लि., २८ ए, लक्ष्मी इंडस्ट्रीयल इस्टेट, एस. एन. पथ, लोअर परेल (पश्चिम), मुंबई – ४०० ०१३. येथे छापून राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लि. प्रियदर्शिनी, आठवा मजला, इस्टर्न एक्सप्रेस हाईवे, सायन, मुंबई – ४०० ०२२ येथे प्रकाशित केले.

संपादक : श्री. शिरीष गंगाधर भोगले

RNI NO. MAHMAR/2009/32806

यह मासिक मुद्रक एवं प्रकाशक मा. श्री. शिरीष गंगाधर भोगले इन्होने राष्ट्रीय केमिकल्स एण्ड फर्टिलाइजर्स लि. मुंबई, इनके लिए मे. सॅप प्रिंट सोल्युशन्स प्रा. लि., 28 ए, लक्ष्मी इंडस्ट्रीयल इस्टेट, एस. एन. पथ, लोअर परेल (पश्चिम), मुंबई – 400 013. यहाँ मुद्रित करके राष्ट्रीय केमिकल्स एण्ड फर्टिलाइजर्स लि. प्रियदर्शिनी, आठवी मंजिल, इस्टर्न एक्सप्रेस हाईवे, सायन, मुंबई – 400 022 यहाँ से प्रकाशित किया।

संपादक : श्री. शिरीष गंगाधर भोगले

RNI NO. MAHMAR/2009/32806

CRM, RCF